# सेवक वार्ता

ऑगस्ट - २०२४

वर्ष -५ अंक- १०

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचे संवाद पत्र


## सेवकच्या शिरपेचामध्ये आणखी एक तुरा

मध्य चांदा वन विभाग अल्ट्रा टेक सीमेंट लिमिटेड (माणिकगड यूनिट) गडचांदूर करिता वळती करावयाचे प्रकल्प बाधित वनक्षेत्राकरीता वन्यजीव शमन आणि संवर्धन आराखडा

उप वन संरक्षक, मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१२/ सर्व्हे / जमीन /२०२४-२५ चंद्रपूर दि. निरंक अन्वये मे. अल्ट्रा टेक सीमेंट लिमिटेड (माणिकगड यूनिट) गडचांदूर करिता वळती करावयाचे १९०.४२ हे. प्रकल्प बाधित वनक्षेत्राचे वन्यप्राणी उपशमन योजना / आराखडा तयार करून देण्याबाबत आलेल्या प्रस्तावास अनुसरून खालील प्रमाणे देकार मान्यतेस अमरावती शाखेने त्यांना सादर केला आहे.

१. सदर प्रकरणी प्रकल्प बाधित क्षेत्र निरीक्षण करण्यास किमान दोन दिवस अपेक्षित आहे. अनपेक्षित पाऊस आल्यास यात वाढ होवू शकेल.

२. याकरिता सेवक संघ दोन सदस्य चमू एकूण दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी दुपारी चंद्रपूर येथे पोहचतील. सायंकाळी आपणासोबत सविस्तर चर्चा केल्यानंतर पुढील स्थळ निरीक्षनाचा कार्यक्रम ठरविण्यात येईल.

३. त्यापूर्वी आपणाकडून खालील नमूद माहिती उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.

सदर प्रस्तावाची प्रत आणि त्याची KML फाइल व नकाशा

(1) (ii) सदर क्षेत्रातील वन्यप्राणी प्रगणना अहवाल (मागील ५ वर्षाचा)

(iii) सदर क्षेत्रातील मनुष्यप्राणी व पशुहानी संबंधित मागील ५ वर्षाचा गोषवारा GPS नोंदीसह

(iv) सदर क्षेत्रातील अस्तित्वात असलेले नैसर्गिक आणि कृत्रिम पाणवठे

(v) सदर क्षेत्र Eco-sensitive Zone मध्ये असल्याची माहिती

(vi) सदर क्षेत्रालागत असलेल्या गावांची यादी

(vii) विभागाचे कार्ययोजनेची प्रत

४. सदर आराखडा एकूण ५ प्रतीत ५ ऑगस्ट २०१४ पर्यंत वेईल.

५, याकरिता शुल्क रु. १ लाख अधिक १८% GST सह एकूण १,१८,००० अपेक्षित राहील.

## सोलापूर-उस्मानाबाद रेल्वे मार्गासाठी वन्यजीव शमन आणि संवर्धन आराखडा

कल्याण-कसारा तिसऱ्या रेल्वे मार्गासाठीच्या मंजुरीनंतर सेवकला सोलापूर-उस्मानाबादचा प्रकल्पासाठी वन्यजीव शमन आणि संवर्धन योजना तयार करण्यासाठी संधी मिळण्याच्या आशा द्विगुणित झाल्या होत्या त्या प्रत्यक्षात येत आहेत.

चंद्रपूर वन प्रबोधिनीने नवीन सोलापूर-उस्मानाबाद रेल्वे मार्गासाठी वन्यजीव शमन आणि संवर्धन आराखडा तयार करण्याचे काम स्वीकारण्याची तयारी दर्शवली आहे, आणि प्रकल्पासाठी खर्चाचा अंदाज पाठवण्याची सूचना केली आहे.

या कामासाठी सेवकचे खालील सदस्यांची टीम स्थापन करण्याचे ठरविले आहे.

१. व्ही. बी.सावरकर- चमू प्रमुख
२. अजय पिलारीसेट- चमू उप प्रमुख
३. सुभाष बडवे - सदस्य
४. एस. व्ही. कुंभकर्ण- सदस्य
५. डॉ. संतोष यादव - वर्गीकरण शास्त्रज्ञ.
६. पी. बी. धानके- सह- वर्गीकरण शास्त्रज्ञ.
७. व्ही. टी. पत्की - समन्वयक.

श्री. पत्की चमू प्रमुखांशी सल्लामसलत करून खर्चाचा अंदाज तयार करतील आणि त्यांच्या मंजुरीबद्दल माहिती देतील.

## *नवी आव्हाने*

### अभ्यासक्रम सुधारीत करून वाचन साहित्य निर्माण करणेचे काम... प्रगतीचा आढावा

वनरक्षकाचे पायाभूत प्रशिक्षणाकरीता वाचन साहित्यात /अभ्यासक्रमातील सर्व बाबी समाविष्ट आहेत किंवा नाही/ तपासणी करणा-या समिती सदस्य व लेखक यांनी करून वाचन साहित्य अंतिम करण्याची कारवाई जुलै-२४ अखेर पूर्ण केली आहे.

## वेधक वृत्त

### "महाराष्ट्रातील वने" या पुस्तकाच्या निर्मितीची कथा

लेखक - डॉ. शे. हिं. पाटील, भावसे

*"महाराष्ट्रातील वने " असे काही वनाविषयी अस्सल माहिती असलेले उपयुक्त पुस्तक वनाधिका-याने लिहून वन खात्याच्या अर्थ सहाय्याने प्रकाशित झाले आहे, हे योगायोगानेच लेखक - डॉ. शे. हिं. पाटील यांचेकडूनच मला नुकतेच माहित झाले. त्या पुस्तकाच्या निर्मितीची कथा त्यांच्याच शब्दात.*

वनरक्षक, वनपाल व वनविभागाच्या इतर स्पर्धा परिक्षांसाठी लागणारी वनाबद्दलची अचूक माहिती असणारे एखादे पुसतक असावे असे वाटत होते. या परिक्षांसाठी बसणारे विद्यार्थी व त्यांचे पालकही माझ्याकडे मार्गदर्शनासाठी येत असत. वनरक्षक व इतर पदासाठी मुलाखती दरम्यान देखील मुलांचे वनाविषयी सामान्यज्ञान अतिशय कमी असल्याचे जाणवत असे. मुलाखतीत काही मुले तर नागझिऱ्याचे जंगलात सिंह, इती असे प्राणी आढळत असल्याबद्दल माहिती देत. तर ताडोबाच्या जंगलात जिराफ, झेब्रा

हे प्राणी आढळल्याचे ही सांगत. एकंदरीत वनविषयक / वन्यप्राणीविषयक सामान्य ज्ञान कमी असल्याचे व वा विद्यार्थ्यांना व स्पर्धा परिक्षा देणाऱ्या उमेदवारांना ही एकत्रित माहिती कुठेतरी उपलब्ध व्हावी असे वाटत होते. काही सहकाऱ्यांशी देखील याबाबत चर्चा केली असता त्यांनी देखील अशी आवश्यकता असल्याचे सांगितले,

अलिकडे दुरदर्शन सारख्या प्रसार माध्यंमामुळे विद्यार्थ्याचे सामान्यज्ञान चांगले असले तरी खेडयापाड्यातील मुलांचे काय? मी स्वतः एम.एस.सी. झाल्यानंतर अनेक स्पर्धा परिक्षा दिल्या त्यात वनविकास महामंडळाची (**FDCM**), वनपरिक्षेत्र अधिकारी पदासाठी, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (**MPSC**) सहाय्यक वनसंरक्षक पदासाठी व संघ लोक सेवा आयोगाची (**UPSC**) भारतीय वन सेवा परिक्षामधून गेलो असाव्याने याची मला देखील उणीव भासत होती.

वनपरिक्षेत्र अधिकारी पदासाठीच्या मुलाखती दरम्यान मला दहा झाडांची नावे विचारली असता वनापासून दूर असलेल्या आमच्या गावात व सभोवताली आढळणाऱ्या आंबा, जांभुळ, बाभुळ, चिंच, बेल, कवठ, कडूलिंब यापुढे काहीही आठवले नाही. मग मी पेरु, गुलाब, निंबु, अशी नावे सांगितल्यावर बोर्ड मेंबर खळखळून हसले व मी अतिशय खजिल झालो. मात्र बोर्ड मेंबर्सनी माझा प्रयत्न बघून मला मार्क्स चांगले दिले असावेत व माझी त्यामुळेच त्या पदासाठी निवड झाली होती. परंतु सर्वच बोर्ड मेंबर्स ही बाब सहजतेने घेतील असे नाही. मी देखील मुलाखती दरम्यान मुलांना हा प्रश्न विचारला असता ५/६ च्या वर ही संख्या काही जात नसे. तसेच १० पक्ष्यांची नावे विचारल्यावर देखील चिमणी, कावळा, पोपट, कबुतर यापुढे ही काही जात नसे. एकंदरित या विषयाबद्दल माहिती देणारे पुस्तक असावे हे जाणवल्याने हा प्रयत्न. वन व वन्यजीव विषयाचा अभ्यास करणाऱ्या व स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांसाठी हे पुस्तक उपयुक्त ठरेल ही अपेक्षा !महाराष्ट्रातील वने हे पुस्तक आपल्या हाती देताना आनंद होत आहे. महाराष्ट्र राज्यातील वनांची व वन्यप्राण्यांची माहिती देणारे एखादे पुस्तक असावे हे खुप वर्षापासून मनात होते. सेवेत असताना वेळही मिळत नसे. सेवानिवृत्तीनंतर मात्र या कामास लागलो. मागील चार वर्ष या कामी वेळ मिळेसल तसे काम करित गेलो. महाराष्ट्राची माहिती जितकी महत्त्वाची तितकीच देशाची व जगातीलही काही गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. म्हणून त्याही जोडत गेलो.


ज्या बाबी सर्व वनकर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना व सर्वसामान्यांना माहीत असाव्या अशा बाबी या पुस्तकात घेतल्या आहेत. वनविभागात काम करित असताना आपण ज्या शाखेत काम करित आहोत त्याची माहिती असते मात्र इतर शाखेत काय काम चालते हे माहीत नसते. वन्यजीव शाखेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला त्याचा सहकारी सामाजिक वनीकरणात काय काम करित आहे हे बऱ्याचदा माहीत नसते. विशेषतः क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तर हे नक्कीच माहीत नसते.

सर्व सामान्यांना व विद्यार्थ्यांना विशेषतः स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्यांनाही वनांविषयक माहिती फारशी नसते. आता गुगलवर वगैरे माहिती मिळू शकत असली तरी त्याची विश्वासार्हता किती हा प्रश्न असतोच. त्या त्या विभागाच्या संकेतस्थळांवरही माहिती असते मात्र त्यास लागणारा वेळ व दुर्गम भागात नेटवर्कची समस्याही असतेच. म्हणून हा प्रयत्न.

हे पुस्तक सर्व वनकर्मचाऱ्यांना, विद्यार्थ्यांना व स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करणाऱ्या परिक्षार्थींना उपयोगी पडेल अशी अपेक्षा आहे.

या कामासाठी अर्थसहाय्य करून त्याचे प्रकाशन करणाऱ्या महाराष्ट्र शासनाचे कांदळवन कक्षाचे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक श्री. एस. व्ही. रामाराव यांचा भी हार्दिक आभारी आहे.

डॉ. शे. हिं. पाटील भावसे
प्रधान मुख्य वन संरक्षक (सेवानिवृत्त)
माजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ




वन की तुम्ही जवानी हो॥
विश्व रेंजर्स दिवस पर,
दिल से आज बधाई हो।
पान किया विष वन विभागका,
वनकी करी भलाई हो॥
गलती कोई करे कहीं भी,
डांट तुम्हें ही खानी हो।
सुने कोई या करे अनसुनी,
फिर भी बात बतानी हो॥
वर्दी के हो शीर्ष किला तुम,
अनुशासित एक कहानी हो।
निर्देशों की अंतिम सीढ़ी,
बाकी सभी जुबानी हो॥
मैनेजमेंट की संस्था हो तुम,
चाहे जो कुर्बानी हो।
अवसादग्रस्त हो तंत्र समूचा,
फिर भी तुम मुस्कानी हो॥
लिखित तंत्र जब फेल होगया,
तब जुगाड़ बैठानी हो।
विभाग चले दफ्तर से फिर भी,
तुम अमला मैदानी हो॥

थैंक्यू सर तुम हरदम बोलो,
चाहे जो नादानी हो।
दो सेल्यूट तुम सदा सभी को,
चाहे फिसल जुबानी हो॥
सफल काम का क्रेडिट लें सब,
तुम्हें मात्र बदनामी हो।
सबकी नजरें टिकें तुम्ही पर,
जब भी मुंह की खानी हो॥
तुम्हें छोड़कर बचें सभी बस,
मानो तुम बरदानी हो।
कैसी भी हो बिषम परिस्थिति,
तुम तो सफल कहानी हो॥
वन विभाग की बैक बोन हो,
तुम्हारी यही निसानी हो।
अभिनंदन करता है "केशव",
वन की तुम्ही जवानी हो॥
- सादर,
- केशव "खद्योत"

## श्री समर्थ रामदास स्वामी लिखित 'बाग' प्रकरण

श्री समर्थ रामदास स्वामी लिखित 'बाग' प्रकरण अवश्य वाचावे. या प्रकरणात समर्थांनी तब्बल २९५ झाडांची नावे सांगितली आहेत. एका संताचा वनस्पती शास्त्राचा अभ्यास आज आपल्याला थक्क करून सोडणारा आहे.

प्रसंग निघाला स्वभावें ।
बागेमध्ये काय लावावे ।
म्हणूनि घेतली नावे ।
काही एक ॥
कांटी रामकांटी फुलेकांटी ।
नेपती सहमुळी कारमाटी ।
सावी चीलारी सागरगोटी ।
हिंवर खैर खरमाटी ॥
पांढरफळी करवंदी तरटी ।
आळवी तोरणी चिंचोरटी ।
सिकेकाई वाकेरी घोंटी ।
करंज विळस समुद्रशोक ॥
अव्हाटी बोराटी हिंगणबेटी ।
विकळी टांकळी वाघांटी ।
शेर निवडुंग कारवेटी ।
कांटेशेवरी पांगेरे ॥
निरगुडी येरंड शेवरी ।
कासवेद कासळी पेरारी ।
तरवड उन्हाळ्या कुसरी ।
शिबी तिव्हा अंबोटी ॥
कांतुती काचकुहिरी सराटी ।
उतरणी गुळवेल चित्रकुटी ।
कडोची काटली गोमाटी ।
घोळ घुगरी विरभोटी ॥
भोंस बरु वाळा मोळा ।
ऊंस कास देवनळा ।
लव्हे पानि पारोस पिंपळा ।
गुंज कोळसरे देवपाळा ॥
वेत कळकी चिवारी ।
ताड माड पायरी पिंपरी ।
उंबरी अंबरी गंभिरी ।
अडुळसा मोही भोपळी ॥
साव सिसवे सिरस कुड ।
कोळ कुंभा धावडा मोड ।
काळकुडा भुता बोकडा ।
कुरंडी हिरंडी लोखंडी ॥
विहाळ गिळी टेंभुरणी ।
अवीट एणके सोरकिन्ही ।
घोळी दालचिनी ।
कबाबचीनी जे ॥
निंबारे गोडे निंब ।
नाना महावृक्ष तळंब ।
गोरक्षचिंच लातंब ।
परोपरीची ॥
गोधनी शेलवंटी भोंकरी ।
मोहो बिब्बा रायबोरी ।
बेल फणस जांब भरी ।
चिंच अंबसोल अंबाडे ॥
चांफे चंदन रातांजन ।
पतंग मैलागर कांचन ।
पोपये खलेले खपान ।
वट पिंपळ उंबर ॥
आंबे निंबे साखरनिंबे ।
रेकण्या खरजूरी तूंते दाळिंबे ।
तुरडे विडे नारिंगे ।
शेवे कविट अंजीर सीताफळे ॥
जांब अननस देवदार ।
सुरमे खासे मंदार ।
पांढरे जंगली लाल ।
पुरे उद्वे चित्रकी ॥
केळी नारळी पोफळी ।
आवळी रायआवळी जांभळी ।
कुणकी गुगुळी सालफळी ।
वेलफळी माहाळुंगी ॥
भुईचांफे नागचांफे मोगरे ।
पारिजातक बटमोगरे ।
शंखासुर काळे मोगरे ।
सोनतरवड सोनफुले ॥
जाई सखजाई पीतजाई ।
त्रिविध शेवंती मालती जुई ।
पाडळी बकुळी अबई ।
नेवाळी केतकी चमेली ॥
सुर्यकमळिणी चंद्रकमळिणी ।

जास्वनी हनुमंतजास्वनी ।
केशर कुसुंबी कमळिणी ।
बहुरंग निळायाति ॥
तुळसी काळी त्रिसेंदरी ।
त्रिसिंगी रायचचु रायपेटारी ।
गुलखत निगुलचिन कनेरी ।
नानाविध मखमाली ॥
काळा वाळा मरुवा नाना ।
कचोरे गवले दवणा ।
पाच राजगिरे नाना ।
हळदी करडी गुलटोप ॥
वांगी चाकवत मेथी पोकळा ।
माठ शेपु खोळ बसळा ।
चवळी चुका वेल सबळा ।
अंबुजिरे मोहरी ॥

कांदे मोळकांदे माईणमुळे ।
लसूण आलें रताळें ।
कांचन कारिजे माठमुळे ।
सुरण गाजरें ॥
भोंपळे नाना प्रकारचे ।
लहानथोर पत्रवेलीचे ।
गव्याचे पेढ्या सांगडीचे ।
वक्र वर्तुळ लंबायमान ॥
गंगाफळ काशीफळे क्षीरसागर ।
सुगरवे सिंगाडे देवडांगर ।
दुधे गंगारूढे प्रकार ।
किनऱ्या रुद्रविण्याचे ॥
वाळक्या कांकड्या चिवड्या ।
कोहाळे सेंदण्या सेंदाड्या ।
खरबूजा तरबुजा कलंगड्या ।
द्राक्षी मिरवेली पानवेली ॥
दोडक्या पारोशा पडवळ्या ।
चवळ्या कारल्या तोंडल्या ।
घेवड्या कुही-या खरमुळ्या ।
वेली अळूचमकोरे ॥
अठराभार वनस्पती ।
नामे सांगावी किती ।
अल्प बोलिलो श्रोतीं ।
क्षमा केली पाहिजे ॥

************************

### नवीन आजीवन सदस्य

अमरावती शाखेत नवीन आजीवन सदस्य दाखल झाले.
1.श्री. बी. टी. इंगळे, निवृत्त सहायक वनसंरक्षक
2.श्री. डी. बी. पवार, निवृत्त वन परिक्षेत्र अधिकारी.

••◈•• ••◈••

श्रावण मासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहिकडे



### *अशीही आठवण....*

दि.२७ जुलै रोजी सन्माननीय श्री. विठ्ठल पत्की सर यांचा वाढ दिवस होता. त्याबाबत सामाजिक माध्यमावरील आढावा घेता त्यांना सेवक संघ परिवारकडून व अनेकांकडून त्यांचेवर वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छांचा अक्षरशः पाऊस पडला.

प्रसंगवत, इथे मला असे कळवावेसे वाटते की, सामाजिक वनीकरण विभागाच्या रोपवाटिकांचे मूल्यांकन संबंधात मी त्यांना नेहतीप्रमाणे भ्रमणध्वनी केला असता ते अतिदक्षता विभागात दाखल असल्याचे त्यांचे सुपुत्र श्री. प्राजक्त यांनी सांगितले. पण, कुणाचा व कश्याबद्दल फोन आहे हे समजताच व अतिदक्षता विभागात असतांना देखील त्यांनी या कामाबाबत सविस्तर चर्चा करून मार्गदर्शन केले. या प्रसंगावरून त्यांचे सेवक संघाप्रती असलेले जीवापाड प्रेम व सेवक निष्ठा प्रकर्षाने लक्षात येते. त्यांचे कौतुक व ऋणनिर्देश करायला सेवकचा पुर्ण अंक अपुरा पडेन. असो. अतिदक्षता विभागातूनही कर्तव्यपरायणतेची ही आठवण माझ्या व आपल्याही स्मरणात कायम राहील. त्यांना दीर्घ आयुरारोग्य लाभो, हीच आमुची प्रार्थना.

••◈•• ••◈••

### *निधन वार्ता*

नरेंद्रसिंग गुलाबसिंग जाधव, सेवानिवृत्त स. व. सं. रा. मांजरोद, ता. शिरपूर,जि . धुळे यांचे अमरनाथ तीर्थ यात्रा करून परत येताना हृदयविकाराने श्रीनगर येथे दि.५/८/२४ रोजी निधन झाले.

**सेवक संघ परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.**

••◈•• ••◈••

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन - एस. के. गवळी
कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६